# जाहिरात

## शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका
## कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
## जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे -5

शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका संचलित उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळांसाठी तात्पुरत्या स्वरुपात दरमहा रक्कम रु. 10,000/- एकवट मानधनावर करार पद्धतीने 6 महिने मुदतीसाठी शिक्षकांची निवड, प्रतीक्षा यादी शैक्षणिक, व्यावसायिक पात्रतेच्या गुणानुक्रमे करण्यात येणार आहे. खालील नमूद केलेली शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता व अटींच्या पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात वैयक्तिक माहितीचा अर्ज, गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रकांच्या प्रमाणित छायांकित प्रती जोडून अर्ज शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिका कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे 5 येथे सकाळी 11.00 ते 2.00 या वेळेत हस्तपोच स्वीकारण्यात येतील. जाहिरात दिनांकापासून 7 दिवसांपर्यंत आलेल्या पूर्ण अर्जाचा विचार केला जाईल. मुदतीनंतर व अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. यासंदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच पोस्टाने आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत आणि त्याचा विचार केला जाणार नाही.

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता - प्राधान्यक्रम :**

1. इयत्ता 1 ली ते डी. एड. शिक्षण, टी. ई. टी. व अभियोग्यता चाचणी परीक्षा उर्दू माध्यमातून उत्तीर्ण.
2. इयत्ता 1 ली ते डी. एड. शिक्षण व टी. ई. टी. परीक्षा उर्दू माध्यमातून उत्तीर्ण.
3. इयत्ता 1 ली ते डी. एड. उर्दू माध्यमातून शिक्षण

उर्दू माध्यमातून टी. ई. टी. व अभियोग्यता चाचणी उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. अटी व शर्ती शिथिल करण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहील.

उर्दू माध्यम शिक्षकांच्या रिक्त असलेल्या 41 जागांची आरक्षणे पुढीलप्रमाणे :

**एकूण पदे : 41**

| अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 8 | 25 | 41 |

**गुणदान तक्ता :**

| तपशील | 10 वी (गुण) | 12वी (गुण) | डी. एड. (गुण) | टीईटी (गुण) | अभियोग्यता चाचणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| भारांश | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 50 |

वरील आरक्षणात पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्राप्त व पात्र उमेदवारांनुसार जागांमध्ये बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**अटी व शर्ती :**

- वयोमर्यादा दिनांक 31/10/2018 रोजी सर्वसाधारण व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी अनुक्रमे कमाल 38 व 43 वर्षांपर्यंत राहील.
- आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता विहित केल्यानुसार असणे आवश्यक आहे. गुणवत्ताधारक अर्जदाराचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. अर्ज करताना उमेदवाराने जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची अथवा शालांत परीक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
- अर्जासोबत उमेदवारांनी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, जातीचा दाखला इ. आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. सत्य प्रती जोडल्या नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
- महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
- **सदर नेमणूक कालावधी 6 महिनेकरिता किंवा त्यापूर्वी संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. महापालिका आयुक्त यांचा राहील.** या पदावर उमेदवारास शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे मनपा सेवेत हक्क मागता येणार नाही.
- शासकीय वा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे वा प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.
- अर्जदाराने आपले अर्ज शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपाने जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.
- अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारक नसल्याचे आढळून आल्यास व उमेदवार गैरवर्तन/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्द होईल, तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
- उमेदवारांनी मोबाईल क्रमांक / ई मेल आयडी देणे अनिवार्य आहे.
- वेळेअभावी पत्र वा सूचना पाठविणेकामी मोबाईल, एसएमएसचा वापर करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरी/-**
**(शिवाजी दौडकर)**
**प्रशासकीय अधिकारी**
**शिक्षण विभाग (प्राथ.) पुणे मनपा**

### अर्जाचा नमुना

| अर्जदाराचा अलिकडे काढलेला आयकार्ड आकाराचा फोटो स्वयंसाक्षांकित |
|---|

मा. प्रशासकीय अधिकारी
शिक्षण विभाग प्राथमिक, पुणे महानगरपालिका

यांजकडे सविनय सादर

विषय : शिक्षण विभाग प्राथमिक पुणे महानगरपालिकेच्या उर्दू माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये सन 2018-19 या शैक्षणिक वर्षाकरिता 6 महिने कालावधीसाठी एकवट मानधनावर दरमहा रक्कम रु. 10,000/- वर करार पद्धतीने शिक्षक पदासाठी अर्ज.

**महोदय,**

1. **अर्जदाराचे नाव : मराठी :** ---------------------------------------------
   **इंग्रजी : (कॅपिटलमध्ये) :** ---------------------------------------------
2. **कायम राहण्याचा पत्ता :** ---------------------------------------------
3. **दूरध्वनी/मोबाईल नंबर :** --------------------------------------------- : (अनिवार्य)
4. **ई-मेल आयडी :** --------------------------------------------- : (अनिवार्य)
5. **जात :** --------------------प्रवर्ग :------------------------
6. **जन्मतारीख : DD/MM/YYYY संपूर्ण**
7. **वय (दिनांक 31/10/2018 रोजी)** वर्ष-----महिने-----

| अ.क्र. | शैक्षणिक/व्यावसायिक पात्रता | माध्यम | बोर्ड/राज्य | उत्तीर्ण दिनांक | कितीपैकी | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एस. एस. सी. | | | | | | |
| 2 | एच. एस. सी. | | | | | | |
| 3 | डीएड/डीटीएड | | | | | | |
| 4 | टीईटी | | | | | | |
| 5 | अभियोग्यता चाचणी | | | | | | |
| 6 | इतर पदवी, पदविका | | | | | | |

अर्जासोबत माझ्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता गुणपत्रके व इतर प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडलेल्या आहेत. माझी सर्व माहिती ही सत्य व अचूक आहे. नियुक्तीसाठी जाहिरातीमधील विहित अटी व शर्ती मला मान्य आहे.

तरी माझी एकवट मानधनावर करार पद्धतीने सन 2018-19 या शैक्षणिक वर्षासाठी 6 महिने कालावधीसाठी हंगामी शिक्षक या पदासाठी निवड होणेस विनंती आहे.

आपला/आपली विश्वासू,

**सोबत कागदपत्रे :**

1.
2.
3.

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे संपूर्ण नाव)

जाहिरात क्र. १/६३०, दि. १९/११/१८